प्रकरण ३

# महाराष्ट्रातील आद्य सुधारक

भारतात ब्रिटिशांची सत्ता स्थापन झाल्यानंतर त्याचे समाजजीवनावर परिणाम जाणवण्यास सुरुवात झाली. भारतीय इतिहासात एका नव्या विचारप्रवाहाची सुरुवात झाली. सन १८१८ मध्ये पेशव्यांच्या पराभवानंतर भारतात ब्रिटिशांची सत्ता खऱ्या अर्थाने स्थिर झाली. वारंवार होणारी युद्धे, बंड, लूटमार इत्यादींचे अस्तित्व नष्ट होऊन दीर्घकालीन शांतता निर्माण झाली. भारतातील व विशेषतः महाराष्ट्रातील समाजाला हा शांततेचा, एकतंत्री शासनाचा अनुभव नवा होता. भारतीय समाजाचा पाश्चिमात्यांशी संपर्क येण्यास सुरुवात झाली. या संपर्कातून त्यांना नवविचार, आचार, भौतिक प्रगती इत्यादींचे ज्ञान होण्यास प्रारंभ झाला. या संपर्काचे भारतीय समाजाच्या सर्वांगीण जीवनावर परिणाम होण्यास सुरुवात झाली. त्यातूनच सामाजिक सुधारणेच्या चळवळीला गती मिळाली.

महाराष्ट्रात ब्रिटिशांची सत्ता स्थिर झाल्यानंतर प्रारंभीच्या काळात राज्यकारभाराची सूत्रे एल्फिन्स्टन, माल्कम यांसारख्या दूरदर्शी, कर्तव्यतत्पर व मुत्सद्दी अधिकाऱ्यांच्या हाती होती. आपल्या राज्यकारभाराच्या व धोरणाद्वारे येथील समाजाचा विश्वास संपादन करण्याच्या कार्याला त्यांनी प्राधान्य दिले. एतद्देशीय समाजात ब्रिटिश शासनाविषयी तिरस्कार निर्माण होऊ नये याची त्यांनी विशेष काळजी घेतली. महाराष्ट्रात ब्रिटिश शासन स्थिर करण्याबरोबरच येथील समाजाला नवे शिक्षण देणे व सुधारणा घडवून आणणे या कार्यालाही त्यांनी प्राधान्य दिले. ब्रिटिशांनी भारतात शिक्षणप्रसाराला चालना दिली. महाराष्ट्रात विविध शिक्षणसंस्थांची स्थापना करण्यात आली. या कार्यात प्रारंभीच्या काळात ख्रिश्चन मिशनऱ्यांनी मोठे कार्य केले.

शिक्षणाच्या प्रसारामुळे महाराष्ट्रात नवशिक्षित तरुणांची एक नवी पिढी उदयास आली. पाश्चिमात्य संस्कृती, त्यांनी केलेली भौतिक प्रगती, उदारमतवाद, स्वातंत्र्य, मानवता, समानता यांसारख्या आधुनिक विचारांचे, तत्त्वांचे या तरुणांना ज्ञान प्राप्त झाले. या पाश्चिमात्य विद्याविभूषित तरुणांनी भारतातील आपल्या धार्मिक व सामाजिक जीवनाकडे चिकित्सक भूमिकेतून, आत्मपरीक्षणाच्या जाणिवेतून पाहण्यास सुरुवात केली. त्यातूनच सामाजिक व धार्मिक सुधारणा चळवळींना गती मिळाली. भारतीय समाज हा जातींमध्ये विभागलेला असून या जातिसंस्थेच्या बंधनांनी जखडलेला होता. कनिष्ठ जातींवर असलेल्या बंधनांमुळे त्यांना मानवतेचे अधिकारही मिळत नव्हते. शिक्षण ही विशिष्ट जातीचीच मक्तेदारी बनली होती. अनिष्ट सामाजिक परंपरा, सामाजिक बंधने, रोटीबेटी व्यवहारावरील बंधने यांचे समाजात प्राबल्य होते. स्त्रियांची स्थितीही दयनीय होती. त्यांना सामाजिक किंवा धार्मिक जीवनात

Scanned with ACE Scanner

कोणतेही स्थान दिलेले नव्हते. स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार नव्हता. बालविवाह, सतीची पद्धत, जरठ-कुमारी विवाह, भ्रूणहत्या, विधवा विवाहाला बंदी इत्यादी अनिष्ट परंपरांनी स्त्रियांचे जीवन आणखीनच दयनीय बनविले होते.

धार्मिक जीवनात बुद्धिप्रामाण्यापेक्षा शब्दप्रामाण्य व ग्रंथप्रामाण्य यांना महत्त्व मिळाले होते. धार्मिक आचारांच्या बाबतीत पुरोहितांची मक्तेदारी निर्माण झाली होती. अंधश्रद्धा, अनिष्ट परंपरा इत्यादींचे वर्चस्व होते. धार्मिक जीवनात मूलभूत तत्त्वापेक्षा आचारांना प्राधान्य मिळाले होते. सामाजिक व धार्मिक जीवनातील या अनिष्ट परंपरा व अंधश्रद्धा यामुळे समाजाची अधोगती झाली होती. त्यामुळे या सामाजिक व नैतिक अधःपतनाची जाणीव झालेल्या नवशिक्षित तरुणांना, समाजाच्या सामाजिक व धार्मिक जीवनात बदल घडवून आणण्याची गरज वाटू लागली. भारतीय समाजाच्या सामाजिक व सांस्कृतिक परिवर्तनाच्या आवश्यकतेची जाणीव झालेला, समाजसुधारणेची तळमळ असलेला तरुणांचा एक नवा वर्ग उदयास आला. समाजातील अनिष्ट सामाजिक व धार्मिक परंपरांवर टीका करण्याबरोबरच आपल्या विचार, लेखन व कृतींच्या द्वारे समाजात परिवर्तन घडवून आणण्यास या समाजसुधारकांनी सुरुवात केली. त्यात जगन्नाथ शंकरशेठ, बाळशास्त्री जांभेकर, लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख, भाऊ दाजी लाड इत्यादी समाजसुधाकरांचे कार्य महत्त्वपूर्ण आहे. या समाजसुधारकांना महाराष्ट्रातील आद्य समाजसुधारक म्हणता येते.

समाजसुधारणेची तळमळ असलेल्या या तरुणांनी वृत्तपत्रे व ग्रंथाच्या माध्यमाचा मोठा उपयोग केला. ब्रिटिश शासनामुळे उपलब्ध झालेल्या मुद्रणकलेचा व विचारस्वातंत्र्याचा उपयोग करून त्यांनी निरनिराळी वृत्तपत्रे सुरू केली. या वृत्तपत्रांमधून परंपरागत आचार, रूढी, अंधश्रद्धा यावर प्रखर टीका करण्याबरोबरच त्यांनी समाजाला नवविचारांचे ज्ञान करून देण्याचा प्रयत्न केला. आपल्या ग्रंथांमधून स्त्रियांच्या समस्या, विधवा स्त्रियांची दयनीय अवस्था, अस्पृश्यांवरील बंधने यावर टीका करण्याबरोबरच नवसमाजाच्या निर्मितीसाठी कोणत्या सुधारणा होणे आवश्यक आहे हे त्यांनी स्पष्ट केले. या कार्यासाठी नवीन संघटनांची निर्मिती केली गेली. शिक्षणसंस्था सुरू करणे, विधवांचे पुनर्विवाह घडवून आणणे यांसारख्या प्रत्यक्ष कार्यालाही त्यांनी चालना दिली. भारतीयांच्या सामाजिक व धार्मिक सुधारणेच्या गरजेचे प्रतिपादन करण्याबरोबरच ब्रिटिशांच्या अयोग्य धोरणावरही त्यांनी टीका केली.

या काळात ब्रिटिश सत्ताधीशांच्या संपर्कामुळे व शिक्षणामुळे आलेल्या नवविचारांना विरोध करणारा एक गटही समाजात होता. भारतीय समाजातील दोषांवर केली जाणारी टीका या परंपरावादी गटाला मान्य होणारी नव्हती. त्यामुळेच स्त्रियांनी शिक्षण घेणे, विधवांचा पुनर्विवाह करणे, धर्मांतर केलेल्यांना पुन्हा हिंदू धर्मात घेणे यांसारख्या विचार व कार्याला या गटाचा विरोध होता.

त्यामुळेच सामाजिक सुधारणांची तळमळ असलेल्या या समाजसुधारकांना, समाजाला नवविचार देणे, दोष दाखविणे, प्रत्यक्ष कृती करणे, शासनावर टीका करणे याबरोबरच या परंपरावादी गटाचा विरोध प्रखरपणे मोडून काढण्याचे कार्यही आवश्यक बनले होते. समाजाची

Scanned with ACE Scanner

बुद्धिनिष्ठता जागृत व्हावी, आत्मपरीक्षणाने समाजाने धार्मिक व सामाजिक जीवनातील दोष दूर करावे व समाजसुधारणेला गती मिळावी म्हणून या सुधारकांनी अनंत कष्ट घेतले. त्यांच्या विचार व कार्यामुळेच महाराष्ट्रात समाजसुधारणेच्या कार्याला गती मिळाली. त्यामुळे या प्रकरणात सुधारकांच्या कार्याची व त्यांनी मांडलेल्या विचारांची माहिती आपण घेणार आहोत.

## १. जगन्नाथ शंकरशेठ (इ. स. १८०३ ते १८६५)

भौगोलिक, ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि आर्थिकदृष्ट्या मुंबई महाराष्ट्राची राजधानी आहे. त्या मुंबईचे शिल्पकार म्हणून जगन्नाथ ऊर्फ नाना शंकरशेठ यांना ओळखले जाते. नाना म्हणजे बुद्धी, विद्वत्ता आणि कर्तृत्व यांचा महामेरू होते. त्यांच्या या गुणास श्रीमंती आणि दातृत्व यांची जोड मिळाली होती. ते एक सार्वजनिक कार्यकर्ते होते. सामाजिक प्रबोधनात आणि सार्वजनिक जीवनात त्यांनी मोलाची भर घातली आहे. नाना हे जनतेचे स्वयंभू नेते होते. परकीय राज्यकर्त्यांत आणि जनतेत त्यांचा विलक्षण दरारा होता. त्यांनी शैक्षणिक, राजकीय, सामाजिक, धार्मिक अशा विविध कार्यांत भाग घेऊन अनेक नवीन उपक्रम राबविले. महाराष्ट्रीय समाजाला त्यांनी आपल्या कार्याने गतिमान केले.

### जीवन वृत्तांत

१० फेब्रुवारी, १८०३ मध्ये जगन्नाथ शंकरशेठ यांचा जन्म झाला. त्यांचे घराणे दैवज्ञ ब्राह्मण (सोनार) होते. ठाणे जिल्ह्यांतील मुरबाड हे त्यांचे मूळ गाव. तसेच मुरकुटे हे त्यांचे उपनाम होते. त्यांचे वडील शंकरशेठ यांनी मुंबईत जवाहिऱ्यांच्या व्यवसायात फार मोठी संपत्ती मिळविली होती. नाना लहान असतानाच त्यांची आई वारली. वडिलांनी मातेविना पोरक्या मुलाचा चांगला सांभाळ केला. योग्य प्रकारचे शिक्षण त्यांना दिले गेले होते. त्यांच्या वयाला १८ वर्षे पूर्ण झाली त्याच वेळी त्यांचे वडील मृत्यू पावले. त्यामुळे लहान वयातच त्यांच्यावर प्रचंड अशा उद्योगधंद्याची जबाबदारी पडली. ज्या काळात शाळा नव्हत्या, महाविद्यालये नव्हती, त्या काळात विद्या संपादन करणे किती अवघड असले पाहिजे याची कल्पना केली तरी तो काळ आपणास समजू शकेल. नानांना प्रारंभापासूनच विद्येची आवड होती. मराठी, इंग्रजी व संस्कृत भाषेत नानांनी विलक्षण प्रावीण्य मिळविले होते. त्यामुळेच पुढील काळात त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची छाप राज्यकर्त्यांवर पडली.

नानांनी आपला व्यवसाय अत्यंत चिकाटीने व सचोटीने केला. अमाप संपत्ती असूनही तिचा विनियोग विलासी जीवनासाठी न करता जनतेच्या कल्याणासाठी करण्याचेच त्यांनी ठरविले होते. मुंबईच्या सार्वजनिक जीवनात त्यांनी तन, मन, धनाने भाग घेतला. त्यांनी मुंबईच्या शैक्षणिक, राजकीय व सामाजिक क्षेत्रात अजोड असे कार्य केले. अनेक शैक्षणिक, राजकीय व सामाजिक संस्थांशी त्यांचे संबंध होते. सामाजिक कार्यकर्त्यांना कार्य करण्यास ते प्रोत्साहन देत राहिले. अनेक संस्थांना आणि गोरगरिबांना आर्थिक साहाय्य करून आपले दातृत्व सिद्ध केले. ते धार्मिक वृत्तीचे होते. व्यायाम, विद्या व धर्म यांबाबत त्यांना विलक्षण प्रेम होते.

Scanned with ACE Scanner

मुंबई प्रांताच्या बोर्ड ऑफ एज्युकेशनचे ते इ. स. १८५० ते १८५६ पर्यंत सदस्य होते. मुंबई विद्यापीठाने फेलो म्हणून नानांची नियुक्ती केली होती. म्युनिसिपल कमिशनवरही ते सदस्य म्हणून काम पाहत होते. सरकारने त्यांना 'जस्टिस ऑफ दी पीस' हा सन्मान दिला होता. जनतेला न्याय मिळावा म्हणून राजाने नेमलेले प्रतिनिधी असा जे. पी. चा अर्थ होता. त्यांनी या पदाचा खऱ्या अर्थाने उपयोग करून घेतला. त्यांनी जनतेची गाऱ्हाणी सचोटीने सोडविण्याचा प्रयत्न केला. नानांच्या सामाजिक क्षेत्रातील कार्याचा इ. स. १८६५ मध्ये सत्कार करण्यात आला. त्या वेळी अनेक वक्त्यांनी त्यांच्या कार्याची मुक्तकंठाने स्तुती केली. इ. स. १८६५ मध्येच त्यांचा मृत्यू झाला.

**शैक्षणिक कार्य**

नाना शंकरशेठ यांचे शैक्षणिक कार्य अद्वितीय आहे. मुंबई इलाख्यात ब्रिटिश राजवट स्थिरावण्यासाठी गव्हर्नर एल्फिन्स्टन यांनी फार मोठे परिश्रम घेतले. लोकांमध्ये सुधारणा कशा कराव्यात हा मोठा प्रश्न त्यांच्या पुढे होता. त्या वेळी नानांनी एल्फिन्स्टनला स्पष्टपणे सांगितले ते असे, ''विद्यादानाखेरीज आमच्या लोकांचा उद्धार होणार नाही.'' साहेबांना हे विचार पटले. त्यांनी शिक्षणक्षेत्रात नानांच्या सहकार्याने कार्य करण्यास सुरुवात केली. नानांनी मात्र केवळ सरकारवर अवलंबून न राहता स्वतः पुढाकार घेऊन इ. स. १८२२ मध्ये 'बॉम्बे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटी' ही संस्था स्थापन केली. या देशात शिक्षणाचा प्रसार व्हावा या उद्देशाने स्थापन झालेली ही पहिलीच संस्था होती. या संस्थेमार्फत मुंबईत व मुंबईबाहेर अनेक शाळा सुरू केल्या. त्यांना या कामी बाळशास्त्री जांभेकर, सदाशिवराव छत्रे यांचे फार मोठे सहकार्य लाभले. याशिवाय नानांनी अनेक शिक्षणसंस्थांना उदार हस्ते देणग्या दिल्या होत्या.

एल्फिन्स्टन यांनी शिक्षणक्षेत्रात केलेल्या कार्याचे त्यांच्या निवृत्तीनंतर स्मारक उभारण्यासाठी नानांनी पुढाकार घेऊन एक फंड जमविला. त्यांचे ते स्वतः विश्वस्त होते. या फंडातून उच्च शिक्षण देण्यासाठी आणि एल्फिन्स्टन साहेबांचे नाव कायम राहावे म्हणून 'एल्फिन्स्टन कॉलेज' सुरू करण्यात आले. सरकारने शिक्षणप्रसाराच्या कामावर नियंत्रण ठेवण्यासाठी बोर्ड ऑफ एज्युकेशनची स्थापना केली. त्याच्यावर नानांची नियुक्ती केली. इ. स. १८५६ मध्ये त्या बोर्डाचेच सरकारने विद्याखात्यात रूपांतर केले. मुंबई इलाख्यात शिक्षणाची घडी नीट बसविण्याच्या कार्यात नानांचा सहभाग महत्त्वाचा होता हे विसरून चालणार नाही.

इंग्रजी शिक्षणाच्या प्रसारामुळे जनतेत जागृती होत होती. सार्वजनिक हिताची आवड तरुणांच्यात निर्माण झाली होती. ती वाढावी म्हणून इ. स. १८४५ मध्ये दादाभाई नौरोजी, डॉ. भाऊ दाजी आणि विश्वनाथ नारायण मंडलिक यांनी 'स्टुडंट लिटररी अँड सायंटिफिक सोसायटी'ची मुंबईत स्थापना केली. या संस्थेला नानांनी सर्वतोपरी सहकार्य केले. मुलींना शिक्षण दिले तर त्यांच्या नवऱ्याचे आयुष्यमान कमी होते असा लोकांमध्ये गैरसमज होता. त्या वेळी नानांनी स्वतःच्या जागेत 'जगन्नाथ शंकरशेठ' मुलींची शाळा काढली. त्या काळात स्त्रियांच्या शिक्षणाचे कार्य करणे म्हणजे निंदानालस्ती व छळ करवून घेणे असे होते. नानांनी त्यास भीक न घालता स्त्रीशिक्षणाचा पाया घातला. हे कार्य त्यांच्या धाडसाचे तसेच दूरदृष्टीचे एक उत्तम

उदाहरण आहे. रॉबर्ट ग्रँट या गव्हर्नरच्या स्मृतिप्रीत्यर्थ ग्रँट मेडिकल कॉलेजची स्थापना करण्यात नानांचा सहभाग महत्त्वाचा होता. इ. स. १८५९ साली मुंबई विद्यापीठाची स्थापना झाली. तिचे पहिले फेलो म्हणून नानांची नियुक्ती झाली. यावरून त्यांच्या शैक्षणिक कार्याची महती कळते. मुंबई इलाख्यात पुढील काळात शिक्षणाचा जो वृक्ष फोफावला त्याचे बीजारोपण नानांनीच केले होते. या संदर्भात दादाभाई नौरोजींनी असे म्हटले आहे, ''आपण भारतीय लोक जगन्नाथ शंकरशेठचे ऋणी राहिलो पाहिजे, कारण त्यांनी शिक्षणाचे बीजारोपण करून त्याची जोपासना केली व अत्यंत काळजीपूर्वक वाढ केली.'' असे अमोल शैक्षणिक कार्य करणाऱ्यांत ते अग्रणी होते. नानांच्या शैक्षणिक कार्याचे स्मारक म्हणून इ. स. १८५७ मध्ये 'दि जगन्नाथ शंकरशेठ फर्स्ट ग्रेड अँग्लो व्हर्नाक्युलर स्कूल' काढण्यात आले. तसेच नानांच्या चिरंजीवानी त्यांच्या स्मरणार्थ एस. एस. सी. परीक्षेत संस्कृत विषयात पहिला व दुसरा येणाऱ्या विद्यार्थ्यांस शिष्यवृत्ती ठेवली आहे. भारतीयांना कलाविषयक शिक्षण मिळावे यासाठी नानांनी खूप प्रयत्न केले व त्यातूनच आजचे **'जे जे स्कूल ऑफ आर्ट'** हे महाविद्यालय निर्माण झाले.

## सामाजिक कार्य

सामाजिक सुधारणेबाबत नानांचे विचार पुरोगामी होते. मराठी माध्यम, स्त्रीशिक्षण, सतीबंदी, शुद्धीकरण इ. सुधारणांना त्यांनी चालना दिली. स्त्रियांच्या उद्धाराचे कार्य हाती घेणाऱ्या समाजसुधारकांना त्यांनी प्रोत्साहन व साहाय्य केले होते. समाजहितासाठी केलेल्या कायद्याची परिणामकारक अंमलबजावणी होण्यासाठी लोकमत अनुकूल व्हावे लागते हे नानांनी ओळखले होते. त्यांनी या क्षेत्रात बहुमोल कामगिरी बजाविली सतीबंदीच्या वेळी नानांनी ही चाल अमानुष आहे असे लोकांच्या मनावर बिंबविले. त्यामुळे या कायद्याला महाराष्ट्रात कोठेही विरोध झाला नाही. मुंबई इलाख्याच्या कौन्सिलमध्ये निवडून आल्यानंतर नानांनी म्युनिसिपल ॲक्ट व्हावा म्हणून खूप प्रयत्न केले. इ. स. १८४६ मध्ये तो कायदा पास झाला. त्यानुसार मुंबई शहराच्या आरोग्याची आणि सुखसोईंची व्यवस्था करण्यासाठी स्वतंत्र म्युनिसिपल कमिशन नेमण्यात आले. त्यावर नानांची नेमणूक करण्यात आली. त्यांनी त्याद्वारे मुंबईच्या नागरी जीवनाची मुहूर्तमेढ रोवली: या संदर्भात दिशांना वाच्छा म्हणतात, ''मुंबई म्युनिसिपालिटीचा जो भव्य पसारा आपण पाहतो त्याचे श्रेय त्या वेळच्या सरकारी अधिकाऱ्यांइतकेच नामदार जगन्नाथ शंकरशेठ यांना द्यावे लागले.''

मुंबईच्या सांस्कृतिक आणि बौद्धिक जीवनात परिवर्तन करण्यासाठी स्थापन झालेल्या सर्व संस्थांत नानांचा सहभाग होता. रॉयल एशियाटिक सोसायटीच्या मुंबई शाखेचे एक भव्य ग्रंथालय आहे. त्याला नानांनी फार मोठी मदत केली आहे. विज्ञानावरील अनेक मौल्यवान ग्रंथ त्यांनी स्वतः घेऊन या संस्थेला दान दिले आहेत. 'ॲग्री-हॉर्टिकल्चरल सोसायटी आणि जॉग्रफिकल सोसायटी' यांच्या स्थापनेत नानांचा वाटा सिंहाचा होता. राणीच्या बागेतील पदार्थसंग्रहालयास त्यांनी भरपूर मदत दिली होती. नानांचे सर्वांत महत्त्वाचे कार्य म्हणजे बोरीबंदर ते पुणे अशी रेल्वे सुरू करण्यासाठी त्यांनी फार मोठे प्रयत्न केले. त्यांच्याच प्रयत्नामुळे ती सुरू झाली. त्यामुळे मुंबई इतर महाराष्ट्राला जोडली गेली. दळणवळणाच्या

Scanned with ACE Scanner

सुविधेबद्दल नानांची दूरदृष्टी कोणती होती हे यावरून स्पष्ट होते. नानांनी आपल्या हयातीत अव्याहतपणे लोकसेवा केली. त्याचे फळ म्हणजेच त्यांच्या हयातीत त्यांचा संगमरवरी पुतळा उभारण्यात आला.

सरकार आणि जनता यांचा नानांनी पूर्ण विश्वास संपादन केला होता. त्यांच्या घरात जनतेला मुक्तद्वार होते. इ. स. १८३७ मध्ये भिवंडीत जातीय दंगल झाली. विठ्ठलाची मूर्ती फोडण्यात आली. हिंदूंनी मुस्लिमांच्या विरुद्ध कोर्टात फिर्याद दाखल केली. निकाल हिंदूंच्या विरुद्ध लागला. लोक नानांच्याकडे आपली गाऱ्हाणी घेऊन गेले. नानांनी गव्हर्नरांची भेट घेऊन खटल्याची फेरतपासणी करविली. दंगेखोरांना कडक शिक्षा होऊन हिंदूंना न्याय मिळवून दिला. इ. स. १८३६ मध्ये सरकारने सोनापूरची स्मशानभूमी शिवडीला हलविण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे जनतेच्या अनेक गैरसोई होणार होत्या. जनता या निर्णयाविरुद्ध प्रक्षुब्ध झाली होती. जनतेच्या भावना लक्षात घेऊन नानांनी प्रयत्न केले. लोकांच्या गैरसोई गव्हर्नरांना पटवून दिल्या. शेवटी गव्हर्नरांनी तो निर्णय रद्द केला. मुंबईतील वाढत्या लोकसंख्येला भरपूर पाणीपुरवठा व्हावा म्हणून विहीर-तलांवाची योजना नानांनी आखली. चिंचपोकळीतील गॅस कंपनी त्यांच्याच प्रयत्नामुळे झाली. मुंबईत नाट्यगृह व्हावे म्हणून त्यांनी प्रयत्न केले. त्याखेरीज दवाखाने, धर्मशाळा, मंदिरे इत्यादींना त्यांनी सढळ हाताने मदत केली.

### राजकीय कार्य

नानांचा लोकसेवेचा दृष्टिकोण व्यापक होता. ते लक्ष्मीपुत्र असूनही त्यांनी जनसेवेचे व्रत अंगीकारले होते. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात सुधारणा व्हावी असा त्यांचा दृष्टिकोण होता. जनतेच्या अडीअडचणी, दुःखे यांना वाचा फोडून ती सरकारकडून सोडवून घेण्याचा प्रयत्न नानांनी आयुष्यभर केला. महाराष्ट्रात नुकतीच इंग्रज राजवट स्थिरावत होती. काही उदारमतवादी गव्हर्नरांनी लोकहिताला प्राधान्य देण्याचे प्रयत्न सुरू केले होते. अशा वेळी शासनकर्त्यांना सहकार्य करून सत्तेचा लोकांच्या हितासाठी वापर करून घ्यावा असा विचार नानांनी केला होता.

जनतेची दुःखे सरकारला दाखविण्यासाठी व सरकारच्या लोकहिताच्या योजनांना सहकार्य करण्याच्या हेतूने नाना शंकरशेठ व दादाभाई नौरोजी यांनी पुढाकार घेऊन इ. स. १८५२ मध्ये 'बॉम्बे असोसिएशन' ही संस्था मुंबई शहरात स्थापन केली. नंतरच्या काळात ही संस्था राजकीय चळवळीचे केंद्र बनली. या संस्थेच्या संदर्भात त्यांनी काढलेले उद्‌गार पुढीलप्रमाणे, ''या देशातील जनतेचे कल्याण करावे अशी इंग्रज सरकारची इच्छा आहे हे खरे, पण आमची अशी काही दुःखे आहेत की सरकारच्या नजरेस येत नाहीत. म्हणून ती सरकारच्या नजरेस आणून द्यावीत आणि रयतेच्या सुखाकरिता सरकारला हरएक गोष्टीत साहाय्य करावे म्हणून ही संस्था काढली आहे.''

या संस्थेमार्फत हिंदी लोकांना कायदेमंडळात प्रतिनिधित्व मिळावे म्हणून बरेच प्रयत्न केले. परिणामी, इ. स. १८६१ मध्ये हिंदी लोकांना कायदेमंडळात प्रवेश मिळाला. नाना मुंबई इलाख्याच्या कायदेमंडळात सदस्य होणारे पहिले हिंदी गृहस्थ ठरले. कायद्याचे त्यांना उत्तम

Scanned with ACE Scanner

ज्ञान होते. इंग्रजीवर प्रभुत्व होते. तसेच कोणत्याही प्रश्नाचा ते सखोल अभ्यास करीत, चिंतन करीत. त्यामुळे त्यांची छाप अधिकाऱ्यावर पडत असे. त्यांचे सरकारात वजन निर्माण झाले होते. इ. स. १८३५ मध्ये त्यांची जस्टिस ऑफ पीस या पदावर नेमणूक झाली. हिंदी लोकांना ग्रॅंडज्युरीमध्ये नेमावे म्हणून त्यांनी प्रयत्न केले. स्मॉल कॉज कोर्टातील खटले चालविण्याचा अधिकार फक्त बॅरिस्टर पदवी संपादन करणाऱ्यांनाच होता. त्यांची फी फार असे, सामान्यांना ती परवडत नसे. त्यांचे हाल होत. यासाठी नानांनी आपले सरकारमध्ये असलेले वजन खर्च करून स्मॉल कॉज कोर्टात काम करण्यास वकिलांना परवानगी मिळवून दिली.

इंग्रजांच्या अमदानीत काळा-गोरा असा भेद सर्वत्र केला जात होता. वर्णभेदामुळे भारतीयांना वाईट वागणूक मिळत होती. हा वर्णभेद नाहीसा व्हावा व त्यांना सर्व सुविधा मिळाल्या पाहिजेत या मताचे नाना आग्रही होते. या त्यांच्या राजकीय क्षेत्रातील कार्यामुळे त्यांची दृष्टी किती सूक्ष्म होती हे दिसून येते.

### योग्यता

नाना शंकरशेठ यांनी विविध क्षेत्रांत केलेले कार्य त्यांच्या कर्तृत्वाची साक्ष देण्यास पुरेसे आहे. आधुनिक भारत निर्माण करणाऱ्या आद्य पुरुषांत नानांचा समावेश केला जातो. मुंबईचे ते जनक होते हे निर्विवाद. त्यांचे जीवन म्हणजे मुंबईचा इतिहास. परकीय राज्यकर्त्यांपुढे कोणतीही लाचारी न पत्करता किंवा लोकहिताला कोणत्याही प्रकारे मुरड न घालता राजा आणि प्रजा ह्यांचा विश्वास नानांनी संपादन केला होता. ते निस्पृह राजकीय व सामाजिक कार्यकर्ते होते. शिक्षणाच्या उभारणीत त्यांचा फार मोठा वाटा आहे. स्त्रियांच्या शिक्षणाबद्दल त्यांना तळमळ होती. म्हणून त्यांच्यासाठी त्यांनी खास शाळा काढल्या. मराठी भाषेतून शिक्षण मिळावे म्हणून त्यांनी प्रयत्न केले. वेगवेगळ्या संघटना स्थापून त्या उभारण्यासाठी आपले आयुष्य व धन अर्पण केले. त्यामुळे ते खऱ्या अर्थाने जनतेचे सेवक होते. सर्वांगीण सुधारणेचे ते प्रवर्तक होते. त्यांच्या कार्याविषयी आचार्य जावडेकर म्हणतात, ''लोकांच्या वतीने सरकारशी बोलणारे व मध्यस्थी करणारे मुंबईतील पहिले पुढारी असे त्यांना म्हणण्यास काही हरकत नाही.'' आचार्य अत्रे म्हणतात, ''मुंबईचा अनभिषिक्त सम्राट ही पदवी त्यांना यथार्थ आहे.'' मुंबईमध्ये होऊन गेलेल्या अलौकिक चारित्र्याच्या आणि कर्तृत्वाच्या माणसांतील ते श्रेष्ठ माणूस होते. त्यांनी आधुनिक मुंबईचा पाया घातला. नाना हे जनतेचे स्वयंभू नेते होते. बुद्धी, विद्वत्ता, कर्तृत्व यांचा ते महासागर होते.

Scanned with ACE Scanner

## ३. गोपाळ हरी देशमुख ऊर्फ लोकहितवादी (इ. स. १८२३ ते १८९२)

महाराष्ट्रात राष्ट्रवादी विचारांना प्रवर्तक म्हणून गोपाळ हरी देशमुख ऊर्फ लोकहितवादी यांना ओळखले जाते. त्यांनी सामाजिक सुधारणा, राजकीय सुधारणा, शिक्षण इत्यादी क्षेत्रांत प्रमुख विचार मांडले. त्यांनी अंधश्रद्धेवर व समाजातील जातीयतेवर कठोर टीका केली. सामाजिक सुधारणेबाबत त्यांचे विचार पुरोगामी होते. त्यांच्या विचाराला त्या काळाच्या काही मर्यादा असल्या तरी त्यांचे लेखन व विचार समाजप्रबोधनयुक्त होते हे नाकारून चालणार नाही. उच्च वर्णीयांनी काळ ओळखून आपल्यात बदल केला पाहिजे असे त्यांनी आवर्जून प्रतिपादन केले. त्यांनी ज्ञान, विज्ञान व बुद्धिवाद यांची कास धरली. त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य समाजसुधारणेच्या चिंतनात घालविले. महाराष्ट्रातील समाजात जागृती निर्माण करण्याचे कार्य त्यांनी केले. अशा थोर समाजसेवकाचे प्रथम आपण थोडक्यात चरित्र पाहू.

### जीवन वृत्तांत

गोपाळ हरी देशमुख ऊर्फ लोकहितवाही यांचा जन्म पुणे येथे १८ फेब्रुवारी, १८२३ मध्ये

Scanned with ACE Scanner

झाला. त्यांचे उपनाव 'सिद्धेय' असे होते. त्यांचे वडील पेशव्यांचे सेनापती बापू गोखले यांचे फडणीस होते. त्यांना त्यांच्याकडून तीन गावची देशमुखी मिळालेली होती. त्यामुळे त्यांना देशमुख हे नाव मिळाले. पेशवाईचा अस्त झाल्यानंतर ठरावीक मुदतीत गव्हर्नर एल्फिन्स्टन यांना भेटण्यास त्यांचे वडील गेले नाहीत, त्यामुळे ती जहागिरी जप्त केली. परंतु बाजीराव पेशव्यांनी मध्यस्थी करून ती त्यांना परत मिळवून दिली. परंतु त्यांच्या हयातीपर्यंतच तिची मर्यादा होती.

गोपाळराव तेरा वर्षांचे असतानाच त्यांचे वडील वारले. त्यामुळे त्यांच्या कुटुंबावर फार मोठी आपत्ती कोसळली. वडिलांच्या मृत्यूबरोबर जहागिरी जप्त झाली. ती परत मिळावी म्हणून गोपाळरावांचे ज्येष्ठ बंधू चिमणराव यांनी बरेच प्रयत्न केले. परंतु त्याचा काही उपयोग झाला नाही. मात्र त्यांच्या मातोश्रीला पेन्शन मिळाली. कुटुंबाची जबाबदारी त्या दोघांवर येऊन पडली. गोपाळरावांची शरीरप्रकृती चांगली होती. पोहण्याची, घोड्यावर बसण्याची व नेमबाजीची त्यांना आवड होती. त्याचबरोबर ते कुशाग्र बुद्धीचे होते. संतवाङ्मयाचा त्यांनी अभ्यास केलेला होता. १८४१ मध्ये ते इंग्रजी शाळेत दाखल झाले. त्यांनी तेथील अभ्यासक्रम चिकाटीने व परिश्रमपूर्वक तीन वर्षांत पूर्ण केला. आपल्या बुद्धिमत्तेची छाप त्यांनी शिक्षकांच्यावर पाडली होती. इतिहास हा त्यांचा अत्यंत आवडीचा विषय होता. इतरही विषयांत त्यांची प्रगती वाखाणण्याजोगी होती. त्यांनी याच काळात भाषांतर करण्याचे नैपुण्य मिळविले. त्यांनी संस्कृत ग्रंथातील काही सुभाषिते टिपून काढली होती. ज्ञानार्जनाच्या कोणत्याही साधनाची त्यांनी उपेक्षा केली नाही. संस्कृत, फार्शी, गुजराथी, हिंदी या भाषा त्यांना येत होत्या. त्यांच्यातील विद्याभिरुचीचे ते द्योतक होते.

अभ्यासक्रम पूर्ण झाल्यानंतर त्यांना सरकारी खात्यात इ. स. १८४४ मध्ये भाषांतरकार म्हणून नोकरी मिळाली. तेथे त्यांना दरमहा ७७ रुपये पगार मिळत होता. अंगमेहनत, चिकाटी व कामाची शिस्त व उरक यांमुळे त्यांची दोन वर्षांतच शिरस्तेदार या पदावर नियुक्ती झाली. उत्तरोत्तर त्यांची प्रगती होतच राहिली. १८४६ मध्ये ते मुन्सफची परीक्षा पास झाले. त्यामुळे १८५२ मध्ये त्यांना वाई येथे फर्स्टक्लास मुन्सफ या पदावर नेमले. ते आपल्या कामात अत्यंत दक्ष होते. काम करण्यात वक्तशीरपणा होता. त्यामुळेच त्यांचे वरिष्ठ त्यांच्यावर खुश असत. त्यानंतर १८५६ मध्ये त्यांना इनाम कमिशनवर असिस्टंट कमिशनर व कमिशनर या पदांवर नियुक्त केले. त्यांनी कायद्याप्रमाणे आपले काम केले. त्यामुळे अनेकांची इनामे त्यांनी जप्त केली. त्यामुळे लोकांच्यात त्यांच्याविषयी गैरसमज निर्माण झाला. १८६२ मध्ये अहमदाबाद येथे असिस्टंट जज्ज व नंतर अहमदनगरला जज्ज म्हणून त्यांनी कार्य केले. १८६३ मध्ये सनदी नोकरीला आवश्यक असणारी परीक्षा ते पास झाले. नाशिकला त्यांची जॉईंट सेशन जज्ज म्हणून नेमणूक झाली. १८७९ मध्ये ३५ वर्षे सेवा केल्यानंतर त्यांना पेन्शन मिळाली. नोकरीच्या कालखंडातच त्यांना 'जस्टिस ऑफ पीस' व 'रावबहाद्दर' या पदव्या देऊन त्यांचा सरकारने गौरव केला होता. १८८० मध्ये मुंबई इलाख्याच्या विधिमंडळाचे सदस्य म्हणून त्यांची नेमणूक करण्यात आली. काही काळ त्यांनी रतलाम संस्थानाचे दिवाण म्हणूनही काम केले. अशा थोर पुरुषाचा मृत्यू १८९२ मध्ये झाला.

Scanned with ACE Scanner

## वाङ्मयीन व वृत्तपत्र क्षेत्रातील कार्य

लोकहितवादी जसे समाजसुधारक होते तसेच ते श्रेष्ठ दर्जाचे साहित्यिकही होते. त्यांनी बरेच दिवस साहित्य लिहिले आहे. आपल्या लेखनाच्या स्पष्टीकरणासाठी आणि पुष्टीसाठी त्यांनी प्रस्तावना, तळटीपा आणि परिशिष्टे जोडली आहेत. त्यावरून त्यांच्या लेखनातील विवेचक बुद्धीची साक्ष पटते. त्यांच्या ग्रंथात विषयांची मांडणी व भाषाशैली या फार सरळ व मार्मिक आहेत. आपले पुरोगामी विचार लोकांना पटवून देण्यासाठी कोणाच्याही रागलोभाची त्यांनी पर्वा केली नाही. आपले विचार स्पष्टपणे मांडण्याची त्यांची तडफ असामान्य होती. त्यांचा अंतरीचा जिव्हाळा त्यांच्या प्रत्येक वाक्यात नव्हे, प्रत्येक शब्दात प्रतिबिंबित झालेला आहे. वाङ्मयनिर्मितीमागील आपली भूमिका त्यांनी पुढील शब्दांत स्पष्ट केली आहे, ''लोकहितवादीने कोणाची मजुरी पत्करली नाही, कशाची अपेक्षा, आशा किंवा इच्छा नाही. कोणाच्या सांगण्यावरून किंवा शिकविण्यावरून कृत्रिम वर्णन केले नाही. लाभावर अगर द्रव्यावर नजर ठेवून कीर्ती व्हावी या हेतूने लिहिले नाही. इतके श्रम जे केले ते लोकांस त्यांची वास्तविक स्थिती कशी आहे ती कळावी, त्यांनी सुधारावे, त्यास इहलोकी समृद्धी व्हावी, परलोकाचे साधन घडावे व बहुत काळापासून दृढ भ्रम झाले आहेत, त्यापैकी काही अविचाराने व काही मूर्खपणाने जडलेले आहेत ते कमी व्हावे, इतक्याच हेतूने मी यथामतीने व स्वेच्छेने वेतनावाचून हे श्रम केले आहेत.''

भाऊ महाजन यांच्या 'प्रभाकर' या साप्ताहिकात लोकहितवादींनी इ. स. १८४८ मध्ये लिखाणास प्रारंभ केला. समाजाला उद्देशून लिहिलेली ती पत्रे आहेत. त्यांना 'शतपत्रे' म्हणून ओळखले जाते. ती त्यांच्या सुधारणावादी विचारांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची आहेत. त्यांनी या शतपत्रात राजकीय, धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक विषयांचा परामर्श घेतला आहे. मात्र ही पत्रे एकाच विषयावर सलगपणे लिहिली गेली नाहीत. सुचेल तो विषय घेऊन लिखाण केलेले आहे. लोकहितवादींनी समाजाच्या अत्यंत जिव्हाळ्याच्या विषयावर मराठी भाषेत सुबोध व परिणामकारक चर्चा केली आहे. समाजातील अत्यंत गुंतागुंतीच्या प्रश्नांचा त्यांनी निर्भीडपणे ऊहापोह केला आहे. त्यांची भाषा साधी व सोपी असल्यामुळे वाचकांच्या अंतःकरणाला जाऊन भिडत असे. शतपत्रातून लोभ, भ्रम, अंधश्रद्धा यांवर त्यांनी कठोर टीका केली आहे. आपल्या समाजातील दुष्ट रूढी, परंपरा दूर व्हाव्यात हा त्यामागील प्रामाणिक हेतू होता. एक प्रकारे ते लोकजागृतीचेच काम होते.

त्यांनी इंग्रजी भाषेचा परिश्रमपूर्वक अभ्यास केला होता. परंतु कीर्तीच्या मागे लागून त्यांनी मातृभाषेला कधी ठोकरले नव्हते. साहेबांची मर्जी संपादण्यापेक्षा लाखो अज्ञानी बांधवांना ज्ञानदान करावे याच हेतूने त्यांनी लेखन केले होते. त्यांनी वेगवेगळ्या विषयांवर ३६ ग्रंथ लिहिले आहेत. त्यांची शोधकता व चिकाटी प्रत्येक ग्रंथात दिसून येते. राजकारण व अर्थकारण यांवर त्यांनी 'लक्ष्मीज्ञान', 'हिंदुस्थानास दारिद्र्य येण्याची कारणे आणि त्यांचा परिहार व व्यापारविषयी विचार', 'स्थानिक स्वराज्य व्यवस्था', 'ग्रामरचना' यांसारखे महत्त्वाचे ग्रंथ लिहिले. लोकहितवादींनी ऐतिहासिक ग्रंथांची भरपूर निर्मिती केली आहे. लोकांतील

Scanned with ACE Scanner

ज्ञानसंपादनेच्या वृत्तीबद्दल ते उदास व नाराज होते. त्यांनी हिंदुस्थानचा इतिहास, 'गुजरात', 'लंका', 'राजस्थान', 'पानिपत' इत्यादींवर ग्रंथलेखन केले. त्यांच्या प्रस्तावना मोठ्या मार्मिक आहेत. याशिवाय 'पृथ्वीराज चौहान', 'स्वामी दयानंद सरस्वती' यांची चरित्रे लिहिली आहेत. नीती, धर्म व समाजकारण यावरही त्यांनी बरेच लेखन केले आहे. समाजाचा विकास व्हावा, भौतिकशास्त्रांच्या अभ्यासाची समाजाने कास धरावी यांबाबत त्यांनी अत्यंत तळमळीने लेखन केले आहे. जाती वैमनस्यामुळे आमची अधोगती होते आहे, हे भूत गाडले पाहिजे असे त्यांनी प्रतिपादन केले आहे.

## सामाजिक विचार

लोकहितवादींनी सर्वांगीण सामाजिक सुधारणेचा आग्रह धरला होता. त्यामुळेच त्यांनी समाजातील दोषांवर कडक टीका केली आहे. समाजातील अनिष्ट प्रथा बाजूला सारून सामाजिक प्रगतीचा विचार करावा असा त्यांनी आग्रह धरला होता. भारतीय समाजाच्या अधोगतीला जातिसंस्था कारणीभूत आहे हे त्यांनी ओळखले होते. म्हणून त्यांनी जातिसंस्थेवर कठोर टीका केली आहे. यासाठी त्यांनी इंग्रजांचे अनुकरण करावे असे प्रतिपादन केले आहे. शब्दप्रामाण्यापेक्षा बुद्धिप्रामाण्य स्वीकारावे असा त्यांनी आग्रह धरला होता. नवविचारांच्या स्वीकाराची मागणी त्यांनी केली होती. इंग्रजांत शिस्त, चिकाटी, उद्योगप्रियता, शौर्य, देशाभिमान आढळतो. उलट आम्ही आळशी, भित्रे आणि स्वार्थी आहोत. सामाजिक दृष्टीने इंग्रज स्त्रीदाक्षिण्यवादी, सामाजिक विषमता न मानणारे आहेत तर आम्ही स्त्रीदाक्षिण्य पायदळी तुडवणारे, जातीयता मानणारे, आपपरभावाने विघटित झालेले आहोत असे विचार त्यांनी स्पष्टपणे मांडले. समाजसुधारणेसाठी त्यांनी पुनर्विवाहास विशेष महत्त्व दिले होते. ते म्हणतात, ''ईश्वराने स्त्री व पुरुष सारखेच केले व उभयतांचे अधिकार समसमान आहेत, असे असताना पुरुषास पुन्हा विवाहाची आज्ञा आणि स्त्रियांस मनाई हा केवढा जुलूम आहे.'' त्यांनी बहुपत्नीकत्व, हुंडा, बालविवाह या अनिष्ट पद्धतींवरही टीका केली आहे. स्त्रियांच्या शिक्षणावर त्यांनी भर दिला होता. समाजात उद्योग वृद्धीसाठी एकत्र कुटुंब पद्धती आहे. त्यासाठी त्यांनी विभक्त कुटुंब पद्धतीला सल्ला दिला होता. त्यांनी सामाजिक प्रश्नांचा अगदी बारकाईने अभ्यास केला होता असेच त्यांच्या विचारांवरून दिसून येते.

## धर्मविषयक विचार

लोकहितवादींचा धर्मवाङ्मयाचा अभ्यास चांगला असल्याने धर्मांविषयी त्यांनी समतोल विचार मांडले आहेत. धर्माचा उगम मानवाच्या बुद्धीमध्ये झाला असे त्यांचे ठाम मत होते. आजचा धर्म हा अतिशय विकृत झाला आहे. धर्मांच्या नावावर असे निंद्य प्रकार घडत आहेत. आचारांचे स्तोम माजले आहे असे त्यांचे मत होते. समतेवर आधारलेल्या धर्माचा त्यांनी पुरस्कार केला. सामाजिक व आर्थिक अन्यायाचे निर्मूलन करणारा धर्म त्यांना अभिप्रेत होता. जुने धर्मग्रंथ अभ्यासून आणि त्यातील वचने प्रमाण मानून वागणे मूर्खपणाचे आहे असे ते स्पष्टपणे सांगत. धर्मांच्या नावावर निष्क्रिय राहून चालणार नाही. आपण कृतिशील राहिलो तरच आपली प्रगती होईल. मूर्तिपूजा करू नका. त्यांच्या या विचारामुळे समाजातील अनिष्ट

आचार व निष्ठा थोड्या सैल होण्यास मदत झाली. लोकहितवादींना मानवी जीवनातील तात्त्विक समस्यांपेक्षा सामाजिक समस्यांचे अगत्य अधिक होते. म्हणून भौतिकवाद व बुद्धिवाद यांचे ओझरते दर्शन त्यांच्या धर्मविषयक लेखनात दिसून येते.

## शैक्षणिक विचार

भारतीय समाजाच्या उन्नतीसाठी त्यांच्यात जागृती होणे आवश्यक आहे. त्यासाठी शिक्षणाचा प्रचार व प्रसार झाला पाहिजे असे लोकहितवादी यांचे मत होते. जुनी विद्या समाजाला आता उपयोगी नाही. समाजाची भरभराट होण्यासाठी पाश्चात्त्य भौतिकशास्त्रांचा अभ्यास करावा असे त्यांचे मत होते. जीवनाभिमुख ज्ञान मिळावे असा त्यांचा आग्रह होता. हिंदी लोकांना माणूस म्हणून जगावयाचे असेल आणि सुधारणावादी राष्ट्रांच्या मागे जावयाचे असेल तर त्यांच्या जीवनपद्धती व शिक्षण यांचा स्वीकार करणे आवश्यक आहे. विद्या-प्रसारासाठी मराठी शाळेत इंग्रजी शिक्षक नेमावेत, नॉर्मल स्कूल सुरू कराव्यात, वर्तमानपत्रांचा प्रसार व्हावा, जगप्रवास करावा, वाचनालये काढावीत. अशा अनेक उपयुक्त सूचना त्यांनी केल्या आहेत. लोकहितवादींनी 'ज्ञान हीच शक्ती, शहाणपणाचे अंती सर्व आहे' असे सांगून आधुनिक शास्त्रांचे ज्ञान संपादण्याचा उपदेश केला आहे.

## राजकीय विचार

लोकहितवादींनी राजकीय क्षेत्रात प्रत्यक्ष कार्य केले नाही किंवा एखादी संघटनाही स्थापन केली नाही. मात्र त्यांनी लोकशाहीची पद्धत या देशात आली पाहिजे असे प्रतिपादन केले. त्यांचे हे विचार पुढील काळातील राजकीय चळवळीला मार्गदर्शक ठरतील. त्यांची राजकीय विचारांची सांगड आर्थिक विचारांशी जुळणारी होती. व्यक्तीत समानता असावी व व्यक्तिसुखात जो अडसर असेल तो राज्याने दूर करावा अशी त्यांची विचारसरणी होती. लोकहितवादींनी इंग्रजी शासनाचे फायदे सांगितले आहेत तसेच बहुजन सुखाच्या आड येणाऱ्या शासनकर्त्यांवर टीकाही केली आहे.'भाड्याचा उंट त्याजवर लादतालादता नाळी पडल्या तरी कोणी मनात आणित नाही. एकतर्फी काम चालते. दिवाळखोर सरदारांचा धूर्त कारभारी जसा संसार पाहतो तसे इंग्रज सरकार या देशाचे राज्य चालवीत आहे.' या त्यांच्या आक्षेपावरून शासनाबद्दल त्यांचे काय मत होते ते स्पष्ट होते. राजकीय पारतंत्र्याचे भान लोकहितवादींना होते. त्या दृष्टीने त्यांनी ''आपण सर्व एकत्रित होऊन विलायतेत शिष्टमंडळ पाठवावे आणि आपल्या देशात पार्लमेंट मागून घ्यावे'' अशी सूचना केली आहे. आपल्या लोकांच्या स्वाभिमानशून्यतेची त्यांना चीड होती. लोकहितवादींना स्वराज्याची ओढ होती. कोणत्याही एका व्यक्तीचे किंवा वर्गाचे राज्य नको होते. समाजाच्या सर्व थरातील लोकांचे लोकसत्ताक राज्य व्हावे अशी त्यांची अपेक्षा होती. ब्रिटिश पार्लमेंट हे हिंदुस्थानातील कारभारासंबंधी सवतीच्या मुलाप्रमाणे उदासीन आहे. प्रजेच्या न्याय हक्कासाठी आपण जागरूक राहिले पाहिजे असा त्यांचा सल्ला होता. त्यांची एकूण विचारप्रणाली पाहिली तर महाराष्ट्रातील राष्ट्रवादाचे आद्य प्रवर्तक म्हणून लोकहितवादींना संबोधण्यास काही हरकत येईल असे वाटत नाही.

Scanned with ACE Scanner

## आर्थिक विचार

लोकहितवादींनी भारतीय जनतेच्या आर्थिक दुरावस्थेचे चित्र रेखाटले आहे. प्राचीन काळी भारत आर्थिकदृष्ट्या सुखी होता. पुढे लोकसंख्या वाढली. त्यात परकीयांच्या आगमनाने भर पडली. त्या प्रमाणात उत्पादनाची साधने वाढली नाहीत. भारतीयांचा आळस, अज्ञान व इंग्रजांचा व्यापार यामुळे दारिद्र्यात भरच पडत गेली असे त्यांनी म्हटले आहे. त्यांनी स्वसमाजाला स्वदेशीचा व उद्योग संस्कृतीचा उपदेश केला.

## मूल्यमापन

लोकहितवादींच्या विचारांची झेप आपण पाहिलीच आहे. त्यामुळे त्यांच्या बुद्धिप्रामाण्यवादाची साक्ष पटते. सरकारी नोकरीत असल्यामुळे सामाजिक व राजकीय क्षेत्रातील विचारांना ते प्रत्यक्ष कृतीने साथ देऊ शकले नाहीत. यामुळे त्यांच्या विचारांचे महत्त्व कमी होत नाही. लोकहितवादींचा काळ महाराष्ट्रातील विचार संक्रमणाचा काळ होता आणि आचारातही जुन्या-नव्याचा संघर्ष चालू होता. अशा काळातील व्यक्तींच्या विचारात आणि आचारात कित्येक बाबतीत विसंगती आढळते. तसेच लोकहितवादींच्या बाबत झालेले आढळते. समाजातील जुन्या आचारावर ते कडक टीका करीत पण स्वतःच कित्येक जुन्या सवयींना चिकटून राहत. अशा वेळी विरोधकांकडून असा आक्षेप घेतला जाई की ते नुसते बोलके सुधारक आहेत. ज्या वेळी सुधारणेची तत्त्वे आवेशाने सांगणे हीच मुख्य गरज असते, त्या वेळी ती सांगणे हाच कर्तेपणा ठरतो. ज्या वेळी समाज रूढी-परंपरेच्या वेटोळ्यात अडकला होता त्या वेळी लोकहितवादींनी त्यांना विकासाचा मार्ग दाखवून दिला.

लोकहितवादींनी सामाजिक, आर्थिक, धार्मिक व राजकीय प्रश्नांवर पुरोगामी विचार मांडले. धर्मातील अनिष्ट प्रथांवर टीका केली. मानवी जीवनाकडे पाहणारा परंपरागत दृष्टिकोण बदलला पाहिजे असे त्यांनी प्रतिपादन केले. आपल्या वृत्तपत्रीय व ग्रंथलेखनातून त्यांनी आपला देश व समाजस्थितीचे प्रभावी चित्रण करून समाजाला मार्गदर्शन केले, त्यांनी आधुनिक शिक्षणाची बैठक घालून दिली. आर्य समाजाच्या कार्यातही त्यांनी लक्ष घातले होते. यावरून त्यांचा दूरदर्शीपणा दिसून येतो. ते या समाजाच्या कार्यासाठी नेहमी व्याख्याने देत. सरकारी नोकरीतून निवृत्त झाल्यानंतर 'लोकहितवादी' हे मासिक सुरू केले. डॉ. ना. सि. इनामदार म्हणतात, ''पेशवाईच्या अस्तानंतर संधिकाळात व संक्रमणावस्थेत जी वैचारिक क्रांती या भागात झाली तिचे नेतेपद लोकहितवादींना बहाल करण्यास प्रत्यवाय नाही. त्यांनी पारतंत्र्याचे निदान केले, स्वातंत्र्याचे उपाय सांगितले. राज्यपद्धती सुचविली. इंग्रजी राज्याचे गुणदोष दाखविले. लोकशाहीचा मंत्र सांगितला. आर्थिक अवनीतीची मीमांसा केली. उदारमतवादी विचार मांडले. सामाजिक समतेसाठी प्रयत्न केले म्हणून इंग्रजी काळातील बुद्धिवादी नेता असेच त्यांचे वर्णन करणे योग्य ठरेल.'' बुद्धिप्रामाण्यवादास त्यांनी महत्त्व दिले. कालानुसार धर्मात व चालीरीतीत बदल करावेत, जातीयता नष्ट करावी, स्त्रियांना शिक्षण व बरोबरीचे स्थान द्यावे, आळशीपणा सोडून उद्योगी व्हावे, लोकसत्ताक शासनपद्धती, स्वदेशी, निवृत्तीवादापेक्षा प्रवृत्तीवाद श्रेष्ठ असे वेगवेगळे मार्ग त्यांनी समाजसुधारणेसाठी दाखवून दिले.

Scanned with ACE Scanner

लोकांचे भले व्हावे, त्यांची प्रगती व्हावी यासाठीच ते झटत. म्हणूनच त्यांना लोकहितवादी या नावाने ओळखले जाते.

Scanned with ACE Scanner

## २. आचार्य बाळशास्त्री जांभेकर (इ. स. १८१० ते १८४६)

स्वतःच्या कुटुंबाच्या योगक्षेमाची आद्य जबाबदारी प्रथम पाहून नंतर राष्ट्राच्या जबाबदारीकडे लक्ष घालणारे व ती पार पाडणारे अनेक महापुरुष होऊन गेले. आजही काही तसे आढळतात. तथापि, असे काही महाभाग आहेत की जे आपल्या ध्येयापायी कुटुंब पोषणाची जबाबदारी दुय्यम मानून सर्वस्वीं ध्येयपूर्तीकरिता स्वतःस वाहून घेतात. अशा ध्येयनिष्ठ वर्गापैकी आचार्य बाळशास्त्री जांभेकर हे एक होत. देशात परकीय राजवट स्थिर झाली. नवीन उंचावलेल्या ज्ञानाच्या कक्षा व संस्कृती यांचे पदार्पण झाले. त्यामुळे समाजाची द्विधा मनःस्थिती



Scanned with ACE Scanner

झाली. तो अंधारात चाचपडू लागला. अशा परिवर्तनाच्या काळात धैर्याने आणि व्यापक दृष्टीने विचार करून समाजाला जागृत करणारा आणि मार्ग दाखविणारा तारा म्हणून जांभेकरांच्याकडे पाहिले जाते. आपले राज्य का गेले आणि इंग्रजांचे राज्य या देशात का आले याचे अचूक निदान त्यांनी केले. ज्ञानाचा व विज्ञानाचा प्रसार झाला पाहिजे, त्याशिवाय सामर्थ्य निर्माण होणार नाही हे जाणलेला तो ज्ञानयोगी होता. त्यांना प्रचंड बौद्धिक सामर्थ्य लाभले होते.

## जीवन वृत्तांत

बाळशास्त्री जांभेकर आधुनिक महाराष्ट्रातील पहिले समाजसुधारक, मराठी वृत्तपत्राचे जनक, इतिहास संशोधक आणि विचारवंत होते. त्यांचा जन्म रत्नागिरी जिल्ह्यातील राजापूर तालुक्यातील पोंबुर्ले या खेडेगावी इ. स. १८१० मध्ये झाला. (काही ठिकाणी हे साल इ. स. १८१२ असे आहे.) ते एका व्युत्पन्न पुराणिकाचे सुपुत्र होते. वयाच्या बारा-तेरा वर्षांपर्यंत त्यांनी संस्कृत आणि मराठी भाषेचे अध्ययन पूर्ण केले. पुढे ते इंग्रजी शिकण्यास मुंबईस दाखल झाले. थोड्याच दिवसांत त्यांनी इंग्रजी भाषेवर प्रभुत्व मिळविले. इतर विषयांतही त्यांनी वाखाणण्याजोगी प्रगती केली. शाळेत विद्यार्थी म्हणून शिकत असतानाच ते गणिताचे शिक्षक झाले. त्यांनी संस्कृत, इंग्रजी, मराठी, गणित, भूगोल, गुजराथी, बंगाली आणि फार्शी या विषयांचे ज्ञान संपादन केले होते.

शिक्षणक्रम पूर्ण झाल्यानंतर ते बॉम्बे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटीचे डेप्युटी सेक्रेटरी झाले. लहान वयातच त्यांनी हा सन्मान मिळविला होता. त्यानंतर त्यांची सरकारमार्फत अक्कलकोटच्या युवराजांचे शिक्षक म्हणून नेमणूक झाली. तेथेच त्यांनी कानडी भाषा आत्मसात केली. याच सुमारास मुंबईचे पहिले गव्हर्नर एल्फिन्स्टन यांच्या स्मरणार्थ 'एल्फिन्स्टन कॉलेज' काढण्यात आले. तेथे त्यांची असिस्टंट प्रोफेसर म्हणून नियुक्ती झाली. महाराष्ट्रीय विद्वानाला तो यथोचित मान मिळाला होता असे म्हणावयास काहीच हरकत असू नये. तेथे ते बीजगणित व ग्रहगणित हे विषय शिकवीत होते. पुढे त्यांची शिक्षकांच्या अध्यापन वर्गांचे 'डिरेक्टर' आणि मुंबई इलाख्यातील मराठी शाळांचे इन्स्पेक्टर म्हणून सरकारने त्यांची नियुक्ती केली. विविध पदांवर काम करीत असतानाही त्यांनी इतिहास संशोधनातही भाग घेतला होता. इ. स. १८४६ मध्ये प्राचीन शिलालेखांच्या वाचनासाठी बनवेश्वरला गेले असता तेथे त्यांना तापाने पछाडले. त्यातच त्यांचे आकस्मित निधन झाले.

## शैक्षणिक कार्ये

बाळशास्त्री व्यासंगी व अनेक विषयांचे ज्ञान असलेले अभ्यासक होते. त्यांचा शिक्षणक्षेत्राशी निकटचा संबंध होता. महाराष्ट्राच्या शिक्षणाच्या क्षेत्रात त्यांनी बहुमोल कामगिरी बजावली. इंग्रजी शिक्षण, स्त्री-शिक्षण व पाश्चात्त्य ज्ञानाचा त्यांनी पुरस्कार केला. ते **बॉम्बे नेटिव्ह** एज्युकेशन सोसायटीचे डेप्युटी सेक्रेटरी होते. एल्फिन्स्टन कॉलेजमध्ये प्राध्यापक आणि सरकारच्या शिक्षण खात्यात त्यांनी काम केले होते. त्या काळी ज्ञानाची साधने मर्यादित होती. मुद्रणकला ही बाल्यावस्थेत होती. अशा बिकट परिस्थितीत त्यांनी शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी

वेगवेगळ्या विषयांच्या अभ्यासासाठी पाठ्यपुस्तके तयार केली. इतिहास, भूगोल, व्याकरण, गणित, छंदशास्त्र, नीतिशास्त्र इत्यादी विषयांवर त्यांनी पाठ्यपुस्तके रचली. गणित आणि विज्ञान यांतही त्यांची प्रगती होती. त्यांनी 'शून्यलब्धि' हे पुस्तक मराठी भाषेत लिहिले. बाळशास्त्री जांभेकरांचे शिष्य केशवराव भवाळकर यांनी आपल्या चरित्रात जांभेकरांनी शिक्षकांना केलेला उपदेश दिला आहे. त्यावरून त्यांचा विशाल दृष्टिकोण स्पष्ट होतो. ते म्हणतात, ''पूर्वकाळचे महाप्रबुद्ध ऋषिजन हे अरण्यवास पत्करून विद्यासंपन्न होत आणि विद्यादान करीत. त्यांनी आपल्या देशात अपूर्व ज्ञानभांडारे भरून ठेवली आहेत. ती इतकी तुडुंब आणि ओतप्रोत आहेत की, ती नुसती चाळावयाला संबंध जन्म पुरावयाचा नाही. त्या ऋषींचे आपण वंशज म्हणवतो, मग विद्याभ्यास अन् विद्यादान करण्याची आपणास का लाज वाटावी ? विद्या शिकून तुम्हाला कारकून किंवा अंमलदार व्हावेसे वाटते, शिक्षकाचा व्यवसाय लोक हलका मानतात, पण तसे नाही. प्रजा मूक आहे म्हणून सरकारी नोकरांचे महत्त्व. विद्या प्रसार जसजसा होत जाईल तसतसे सरकारी नोकरांचे ढोंगसोंग अन् थाटमाट नाहीसा होईल. प्रजा शहाणी आणि समजूतदार झाली म्हणजे कारकुनीला कोण विचारतो ? म्हणून विद्याभिलाषी व्हा, विद्याभ्यास करा. लोकांना सुशिक्षण द्या, स्वदेशाभिमान व स्वधर्माभिमान लोकांमध्ये निर्माण करण्याचा प्रयत्न करा.'' या उपदेशावरून त्यांच्या शिक्षणाविषयी विचाराची कल्पना येते.

## वृत्तपत्र व वाङ्मयीन क्षेत्रातील कार्य

बाळशास्त्री एक बुद्धिमान आणि विद्वान पुरुष होते. त्यांनी महाराष्ट्रात सार्वजनिक जीवनाचा पाया घातला. वृत्तपत्र ही जनजागृतीसाठी सार्वजनिक जीवनातील प्रचंड शक्ती आहे हे ओळखून 'दर्पण' हे १८३२ मध्ये मराठी भाषेतील पहिले साप्ताहिक सुरू केले. इंग्रजी व मराठी भाषेत ते निघत होते. त्यांनी समाजाच्या विविध अंगांना स्पर्श करणारे विचार त्यातून मांडले आहेत. स्त्री-शिक्षण, पाश्चात्त्य ज्ञान, विधवा विवाह, शुद्धीकरण इत्यादी सुधारणांचा त्यांनी त्यातून पुरस्कार केला. 'दर्पण'च्या दुसऱ्या अंकात त्यांनी वृत्तपत्रांच्या सामर्थ्याविषयी लिहिले आहे ते असे, ''ही शक्ती आपल्या देशात पूर्वी असल्याचा दाखला नाही. सर्व जगामध्ये पाश्चात्त्य राष्ट्रांची जी प्रगती झाल्याचे आपणास दिसते त्याचे प्रमुख कारण म्हणजे ज्ञानप्रसाराचे आणि लोकजागृतीचे अद्भुत साधन आहे. ज्ञान आणि विज्ञान यांचा पुरस्कार करणे. सार्वजनिक नीतिमत्ता सुधारणे, जनतेला त्यांची कर्तव्ये सांगणे, राज्यकर्त्यांच्या हुकूमशाहीला लगाम घालणे हे सामर्थ्य वृत्तपत्रांच्या अंगी आहे.. ज्या देशात वृत्तपत्रांना लोकांच्या मनावर परिणाम करण्याचे संपूर्ण स्वातंत्र्य मिळाले आहे तो देश खचित धन्य होय.'' शिक्षण हे समाजसुधारणेचे प्रभावी साधन आहे असे त्यांनी प्रभावीपणे मांडले आहे. शिक्षणामुळे प्रतिगामी आणि सनातनी मतांचा लोकांच्या मनावर जो पगडा पडला आहे तो दूर होईल, तसे झाल्याशिवाय समाजाची प्रगती नाही. जीवनाकडे उदार दृष्टीने पाहिले पाहिजे. 'दर्पण' या वृत्तपत्राच्या माध्यमातून त्यांनी लोकांचे या प्रश्नाकडे लक्ष केंद्रित केले. सरकारच्या अन्यायी व अत्याचारी धोरणावरही त्यांनी टीका केली. जनतेतील दोष, त्यांच्या अडाणी

Scanned with ACE Scanner

समजुती दूर करण्याचे प्रयत्न केले. 'दर्पण' बंद होण्याच्या सुमारास म्हणजेच १८४० मध्ये त्यांनी 'दिग्दर्शन' नावाचे मराठी मासिक सुरू केले. विज्ञानाचा लोकांमध्ये प्रचार करणे हा त्यामागील उद्देश होता. या मासिकाच्या प्रस्तावनेत त्यांनी लिहिले आहे," विद्या मनुष्यमात्रास उपयोगी आहे. विद्येपासून कीर्ती, द्रव्य यांचा लाभ होतो. विद्येमुळे पुरुषाचा बहुमान होतो. विद्या श्रीमंतास भूषण, गरिबास पोटास साधन, तरुणास उत्तम उद्योग, वृद्धास विश्रांती आणि सर्वांस मोक्षप्राप्तीचा उपाय आहे." यावरून त्यांचा शिक्षणाविषयीचा दृष्टिकोण स्पष्ट होतो. त्यांचे कार्य व गुण पाहूनच सरकारने त्यांना ' जस्टिस ऑफ पीस' हा बहुमान बहाल केला होता.

साहित्यिक गुण, विद्वत्ता आणि अनेक विषयांचा गाढा अभ्यास यामुळे जांभेकरांनी इतिहास, धर्म, तत्त्वज्ञान, व्याकरण व विज्ञान इत्यादी विषयांवर पुस्तके लिहिली. भारतीय शिलालेख आणि ताम्रपटांचे संशोधन व वाचन करून अनेक निबंध लिहिले. त्यामुळे त्यांना 'आद्य इतिहासकार' मानले जाते. त्यांचे सर्वांत महत्त्वाचे वाङ्मयीन कार्य म्हणजे ज्ञानेश्वरीचे पाठभेदासह संपादन होय. जांभेकरांच्या विद्वत्तेला कल्पकतेची व लोककल्याणाची दृष्टी होती. बाल व्याकरण, नीतिकथा, सार संग्रह, हिंदुस्थानचा इतिहास, संध्येचे भाषांतर, इंग्लंडचा इतिहास, हिंदुस्थानातील इंग्रजी राज्याचा इतिहास, हिंदुस्थानचा प्राचीन इतिहास इत्यादी त्यांचे प्रमुख ग्रंथ आहेत.

### सामाजिक कार्य

त्या काळातील एकूण विचारसरणींचा विचार करता बाळशास्त्री जांभेकर सामाजिक सुधारणेच्या क्षेत्रातही बरेच आघाडीवर होते. इंग्रजांच्या आगमनाबरोबर इंग्रजी विद्या, त्यांचा धर्म व संस्कृतीही भारतात आली. त्यामुळे इंग्रजी शिक्षणाबरोबरच ख्रिस्ती धर्माचाही प्रसार भारतात होऊ लागला हे जांभेकरांच्या लक्षात आले. ते पाश्चात्त्य ज्ञान व इंग्रजी शिक्षणाचे पुरस्कर्ते होते. मात्र त्यांना हिंदू संस्कृतीचा आणि धर्माचा अभिमान होता. सनातनी विचारांचे आणि आचारांचे मात्र त्यांना वावडे होते. धर्मभावनेला उदार बनविले पाहिजे असे त्यांचे स्पष्ट मत होते. त्या काळात जनता अडाणी होती. विद्वान प्रतिगामी होते. धर्माच्या अवडंबराचा समाजावर प्रभाव होता, अशा वेळी त्यांनी मांडलेले विचार खचितच समाजाला उद्बोधक होते. हिंदू धर्मातील वाईट प्रथा बंद पाडाव्यात असे त्यांना वाटत होते. विधवा विवाह, स्त्री-शिक्षण यांबाबत ते आग्रही होते. हिंदू धर्मातून परधर्मात गेलेल्यांना परत शुद्ध करून स्वधर्मात घ्यावे असे त्यांचे स्पष्ट विचार होते. या विचाराशी निगडित असे श्रीपती शेषाद्री यांचे प्रकरण उद्भवले. शेषाद्री या ब्राह्मणाची नारायण व श्रीपाद अशी दोन मुले होती. मिशनऱ्यांच्या शाळेतील सहवासामुळे नारायणाने धर्मांतर केले. ही घटना मुंबईत खळबळ उडवून देणारी ठरली. श्रीपादने धर्मांतर करू नये म्हणून जांभेकरांनी त्याच्या वडिलांना पुढे करून सुप्रीम कोर्टाकडून ताबा मिळविला. परंतु तो काही दिवस मिशनऱ्यांच्या सहवासात राहिला असल्यामुळे तो भ्रष्ट झाला आहे असा सनातनी लोकांनी दावा केला. शास्त्रोक्त पद्धतीने प्रायश्चित्त होऊन श्रीपादला हिंदू धर्मात येता येईल असे बाळशास्त्री जांभेकरांनी मत मांडले. परंतु काही सनातनी पंडितांनी एकदा भ्रष्ट झालेला हिंदू शुद्ध करून घेण्यास शास्त्राची अनुमती नाही असे मत

Scanned with ACE Scanner

मांडले. मात्र जांभेकरांनी श्रीपादला काशीला पाठवून स्वधर्मात शुद्ध करून घेतले. त्याचा परिणाम म्हणून सनातनी लोकांनी शास्त्रींना बहिष्कृत केले. त्यांचा फार मोठ्या प्रमाणात छळ केला. समाजात फूट पाडणे धोक्याचे आहे हे ओळखून शास्त्रींनी प्रायश्चित्त करून घेतले. सामाजिक आणि धार्मिक सुधारणा या बुद्धिवादाने आणि तारतम्याने करावयास पाहिजेत अशी त्यांची भूमिका होती. म्हणूनच त्यांना 'आद्य समाजसुधारक' म्हणून ओळखले जाते.

### योग्यता

परकीय अमलात राष्ट्र जागृतीच्या क्षेत्रात विविध आघाड्या उघडणारे बाळशास्त्री जांभेकर हे महाराष्ट्राचे द्रष्टे महापुरुष होते. त्यांच्या विद्वत्तेचा व कर्तृत्वाचा सर्वत्र दबदबा होता. व्यासंगी, विद्वान, इतिहास संशोधक, चारित्र्यवान शिक्षक, पुरोगामी समाज धर्मसुधारक, लेखक व वृत्तपत्रकार या दृष्टीचे त्यांचे व्यक्तिमत्त्व वैशिष्ट्यपूर्ण होते. त्यांनी स्त्री-शिक्षण, विज्ञानाचा प्रसार, विधवा विवाह, शुद्धीकरण चळवळ इत्यादींचा पुरस्कार केला. लोकजागृतीचे कार्य केले. समाजाचा दृष्टिकोण विशाल, उदार व चिकित्सक बनल्याशिवाय प्रगती होणार नाही म्हणून त्यांनी 'दर्पण', 'दिग्दर्शन' यांसारखी वृत्तपत्रे व मासिके सुरू केली आपल्या लेखनाद्वारे त्यांनी आपल्या बुद्धीची झेप दाखविली. आपल्या समाजाच्या उन्नतीसाठीच त्यांची ही धडपड होती. त्यामुळेच त्यांना 'आद्य सुधारक', 'मराठी वृत्तपत्राचे जनक', 'आद्य इतिहास संशोधक', 'सुधारणावाद्यांचे प्रवर्तक', 'व्यासंगी पंडित' अशा शब्दांनी गौरविले जाते. त्यांच्या संदर्भात हर्डीकर म्हणतात, "निरपेक्षपणे संपूर्ण आयुष्यभर सर्व प्रकारची झीज सोसून लोकशिक्षण, वाङ्मय व इतिहास यांची एकनिष्ठेने सेवा करणारा असा त्यागी कार्यकर्ता फार विरळा. जांभेकरांच्या आयुष्याचे सिंहावलोकन केल्यास त्यात देशभक्ती, लोकसेवेची तळमळ, तत्त्वनिष्ठा व तिच्यासाठी त्याग करण्याची तयारी, लेखनचातुर्य, व्यासंग, चिकाटी इत्यादी सद्गुण प्रकट झालेले आढळून येतात."

Scanned with ACE Scanner